**प्रेस नोट**

**कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनच्या माध्यमातून कर्करोग तपासणी शिबिर**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दि.२६ ते दि.२९ मे २०२५ या कालावधीत कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनमार्फत नागरिकांची मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशयमुख कर्करोग तपासणी शिबिरे राबविण्यात येत आहेत. दि.२६/०५/२०२५ रोजी नवघर आरोग्य केंद्राच्या आवारात सदर व्हॅनमार्फत वैद्यकीय तपासणी करण्यात आली. शिबिराची सुरुवात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. जाफर तडवी, वैद्यकीय अधिक्षक डॉ. श्रीम मिनल पिंपळे व वैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रशेखर कांबळे यांच्या उपस्थितीत करण्यात आली. सदर शिबिरामध्ये ३० वर्षावरील ६४ महिलांची स्तन कर्करोग, ३१ महिलांची गर्भाशयमुख कर्करोग तसेच १०७ नागरिकांची मुख कर्करोग निदानाकरीता तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत वैद्यकीय तपासणी करण्यात आली. अश्याप्रकारे एकूण १२९ नागरिकांनी या तपासणीचा लाभ घेतला.

सदर कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन कर्करोगाच्या निदानासाठी आवश्यक असलेल्या उपकरणांनी सुसज्ज असून यामध्ये मुख कर्करोगाच्या तपासणीसाठी डेंटल चेअर व बायोप्सीकरीता आवश्यक उपकरणे तसेच गर्भाशयमुख कर्करोगाच्या निदानासाठी पॅप स्मेअर आणि व्ही. आय. ए. तपासणी तसेच स्तन कर्करोग बायोप्सीसाठी आवश्यक असलेले उपकरणे उपलब्ध आहेत. तपासणी करण्यात आलेल्या एकूण १२९ नागरिकांपैकी मुख कर्करोग १, स्तन कर्करोग १० व गर्भाशयमुख कर्करोग ४ असे एकूण १५ संशयित रुग्ण आढळून आले, त्यापैकी एका पुरुषाची मुख कर्करोगाच्या निदानाकरीता बायोप्सी करण्यात आली.

दि.२७/०५/२०२५ रोजी भारतरत्न पं. भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय, भाईंदर (प.) येथे सदर कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनमार्फत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाबिनोद शर्मा, मा.अति. आयुक्त, डॉ. संभाजी पानपट्टे, मा. उपायुक्त प्रसाद शिंगटे, मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. जाफर तडवी उपस्थित होते. या ठिकाणी तपासलेल्या एकूण १५६ नागरिकांपैकी मुख कर्करोग ३, स्तन कर्करोग ० व गर्भाशयमुख कर्करोग २ असे एकूण ५ संशयित रुग्ण आढळून आले. सर्व संशयित रुग्णांना नजिकच्या शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले असून त्यांना देण्यात येणाऱ्याा उपचारांचा पाठपुरावा संबंधित नागरी आरोग्य केंद्रामार्फत करण्यात येणार आहे.

सदर कर्करोग निदान शिबिर दि.२८/०५/२०२५ रोजी आयुष्यमान आरोग्य मंदिर- मोर्वा व दि.२९/०५/२०२५ रोजी भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे आयोजित करण्यात आले आहे. तरी कर्करोगाची लक्षणे जसे **मुख कर्करोग** - तोंडामध्ये लाल किंवा पांढरा चट्टा येणे, तोंड उघडण्यास त्रास होणे, **गर्भाशयमुख कर्करोग** - मासिक पाळी व्यतिरिक्त योनीतून रक्तस्त्राव, मासिक पाळीचे चक्र बंद झाल्यावर रक्तस्त्राव होणे, शारीरिक संबंधानंतर रक्तस्त्राव होणे, व योनी मार्गातून दुर्गंधीयुक्त स्त्राव येणे व **स्तन कर्करोग** - स्तनामध्ये गाठ, स्तनाच्या आकारात बदल, स्तनाग्रामधून (निप्पल) पू किंवा रक्तस्त्राव येणाऱ्या व्यक्तींनी सदर शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत करण्यात येत आहे.

**(डॉ. प्रमोद पडवळ)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**